# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


अति तात्काळ

क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि–३/सॅप/२०१२/636

प्रति,

दि. 3 MAR 2012

____________________

____________________

____________________

____________________

(सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तसेच पदविका तंत्रनिकेतने)

विषय :— **सॅप अभ्यासक्रम संस्थांमध्ये चालू करणेबाबत.**

संदर्भ :— १) शासन पत्र क्र. तांशिसॅप–०१–२०११/प्र.क्र.५२/२०११/तांशि–३, दि. ११.०५.२०११

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. ११/ तंशिसं/२०१२/८०, दि. ०१.०३.२०१२

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार महाराष्ट्र शासनाने राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व हॉटेल मॅनेजमेंट इत्यादी संस्थांमध्ये सॅप अभ्यासक्रम चालविण्यासाठी मेसर्स मेलन टेक्नालॉजीज प्रा.लि., मुंबई यांच्याशी सामंजस्य करार करण्यास मंजूरी दिलेली आहे व त्यानुसार सदर कंपनीबरोबर सामंजस्य करार करण्यांत आलेला आहे. त्याची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आलेली आहे. निरंतर प्रशिक्षण योजनेंतर्गत आपले संस्थेत सदरहू अभ्यासक्रम चालू करण्यांत यावे.

सदर अभ्यासक्रमाचा उपयोग विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्यास व त्यांची कार्यकुशलता वाढविण्याच्या दृष्टीने सोईचे होईल. तसेच मा. पंतप्रधानाच्या स्कील अपग्रेडेशन प्रोग्रामचे उदिद्ष्ट गाठण्यासाठी या अभ्यासक्रमाचा उपयोग होणार आहे. अल्पसंख्यांक विभागाच्या रोजगारभिमुख प्रशिक्षण, फी प्रतिपूर्ती केली जाईल. तसेच या योजनांचा लाभ देखिल हा अभ्यासक्रम पूर्ण करणा–या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तरी सदर उपक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने निम्नदर्शित प्रमाणे कार्यवाही करावी.

१. आपले संस्थेमध्ये सॅप अभ्यासक्रमासाठी १ समन्वयकाची नियुक्ती करण्यांत यावी. सदर समन्वयकाने मेसर्स मेलन टेक्नालॉजीज यांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून विद्यार्थ्यांसाठी सेमिनार आयोजित करण्यांत यावे व या अभ्यासक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यांत यावी. जे विद्यार्थी अल्पसंख्यांक राहणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना सॅप १ व सॅप २ या अभ्यासक्रमाचे प्रत्येकी रू. ४०००/– व प्रवेश शुल्क रू. ५००/– इतके शुल्क भरावे लागेल.

२. आपले संस्थेमध्ये शिकत नसलेले विद्यार्थी देखिल या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यांत पात्र राहतील.

तरी मार्च, २०१२ पर्यंत जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमास प्रवेश देण्यांत यावा व याकरीता आवश्यक ती कार्यवाही मेसर्स मेलन टेक्नालॉजीज प्रा.लि., मुंबई यांचेशी संपर्क साधून कार्यवाही करण्यांत यावी. **(श्री मयंक शर्मा, मोबाईल–९८९९५७९४६३)**

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,

नागपूर

प्रत : प्रोग्रामर, सदरहू पत्र आपले कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावे.

Instt. Letter